**प्रेस नोट दिनांक ०७/०३/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे**

**पोलीसांनी वयस्कर महिलेचा शोध घेवुन, तीला तीचे नातेवाईकांचे ताब्यात दिले.**

गणेश पेठ पोलीस चौकी येथे महीला नामे साबेरा मेमन,रा.१०५९ रविवार पेठ,पुणे हि तिच्या राहते घरा मधुन कोठेतरी निघुन गेली, असुन ती वयस्कर असल्याबाबतची माहीती तिचे नातेवाईकांनी दिली. त्यावेळी गणेश पेठ पोलीस चौकी अंमलदार पोलीस हवालदार ६३२४ पोळ यांनी सदर वयस्कर महिलेचे वर्णन व फोटो घेतले. सदर वर्णनाचे वयस्कर महिलेचा गणेश पेठ बीट मार्शल पोलीस शिपाई ९८३१ येनपुरे, व पोलीस शिपाई ९८६३ ढाकणे यांनी शोध घेतला असता, सदर वयस्कर महिला दारुवाला पुल येथील मशिदीचे समोरील फुटपाथवर बसलेली दिसुन आली. त्यानंतर सदर वयस्कर महिलेस गणेश पेठ पोलीस चौकी येथे आणुन, तिला तिचे नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले.

त्यावेळी तिचे नातेवाईकांनी सांगितले की, सदर महिलेचे वय झाले असल्याने ती वारंवार घरातुन निघुन जात असते. तिला सुखरुप त्यांचे ताब्यात दिल्यानंतर तिचे नातेवाईकांनी पोलीस दलाचे आभार मानले.

सदरची कारवाई ही श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उप निरीक्षक श्रीमती गायकवाड, पोहवा पोळ, पोलीस कर्मचारी येनपुरे व ढाकणे यांचे पथकाने केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे